# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांकः २अ/एडीएम/२०१७/9233
दिनांक : 24 OCT 2017

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश होऊनही तो Upload करावयाच्या राहिलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश करून तो प्रवेश दंड आकारून संकेतस्थळावर Upload करण्यास परवानगी देणेबाबत...

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये केंद्रीभूत प्रवेश फेरीमार्फत प्रवेश होऊनही तो संस्थेकडून संकेतस्थळावर Upload करावयाच्या राहिलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश दंड आकारून कन्फर्म करण्याचा प्रस्ताव मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिरण यांना सादर केला होता. संचालनालयाकडे विभागीय कार्यालय पुणे यांच्या अधिनस्त असलेल्या ६७८८-पुणे विद्यार्थी गृहाचे कै गोविंद काशिनाथ पाटे (वाणी) इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट,पुणे या संस्थेच्या एमबीए अभ्यासक्रमाचे २३ विद्यार्थी, ६७५७- यशोदा टेक्नीकल कॅम्पस वाढे,सातारा या संस्थेच्या थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे १ विद्यार्थी आणि विभागीय कार्यालय नागपूर यांच्या अधिनस्त असलेल्या ४१५३-सर्वोदय शिक्षण मंडळाचे सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपुर या संस्थेच्या एमसीए या अभ्यासक्रमात प्रवेशित २८ विद्यार्थ्यांची नावे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश होऊनही अपलोड करण्याची राहून गेली असल्याची प्रकरणे सादर झाली होती.

प्राधिकरणाच्या दिनांक ११.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील प्रवेश विहीत कालावधीत कन्फर्म/अपलोडींग केले नसल्यामुळे सदर प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात आला. सदर बैठकीचे इतिवृत्त प्राप्त होण्यास काही कालावधी लागणार आहे. तथापि अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित झाले नसल्यामुळे विद्यापीठांचे Enrollment करताना अडचणी निर्माण होत आहेत परिणामी विद्यार्थ्यांना प्रथम सत्र परीक्षा देता येणार नाही ही बाब विचारात घेऊन बैठकीच्या इतिवृत्ताच्या अधिन राहुन खालील नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१. ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश फक्त केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत ( कट ऑफ डेटनंतर प्रवेश रद्द केलेले कॅपमधील विद्यार्थी वगळुन ) झालेले आहेत, अशाच विद्यार्थ्यांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रति विद्यार्थी जो दंड आकारण्यात आलेला आहे त्याच्या दुप्पट दंड म्हणजेच रुपये २००००/-(अक्षरी रुपये वीस हजार फक्त) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या उपरोक्त प्रकरणांसाठी आकारुन प्रवेश कन्फर्म/अपलोडीग करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर दंडाची रक्कम तात्काळ धनाकर्षाव्दारे Secretary, Admission Regulatory Authority, M.S., Mumbai यांचे नावे काढुन सदर धनाकर्ष संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे जमा करण्यात यावेत.

२. सदर दंडाची रक्कम विद्यार्थ्यांकडुन वसुल न करता सदर रक्कम संस्थेने स्वत: भरणे आवश्यक असुन तशा आशयाचे हमीपत्र संस्थानी विभागीय कार्यालयामार्फत या संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

E:\Budage\२०१७-१८\General Correspondence\late uploading with fine letter to RO.docx

३. सदर दंडाची रक्कम भरणे संबंधित विनाअनुदानित संस्था, शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थां या सर्वांना लागू आहे.

४. ज्या संस्थानी संस्थास्तरावरील प्रवेश विहित कालावधीत कर्न्फम/अपलोडींग केलेले नाहीत अशा प्रवेशास दि. ११.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली नसल्याने संबंधित संस्थांनी सदर प्रवेश रद्द करून तसे संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ कळविणे आवश्यक आहे . याबाबतीतही केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्यात यावा.

अशा प्रकारे प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्याची कार्यवाही संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत दि. २६.१०.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यात यावी. त्याकरिता आवश्यक ती लिंक विभागीय कार्यालयाना या संचालनालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.विभागीय कार्यालयांनी असे प्रवेश कन्फर्म करण्यापूर्वी संबंधित संस्थांकडून खालील कागदपत्रांची कटाक्षाने पडताळणी करणे आवश्यक आहे.

१. उमेदवाराचा प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत झाला असल्याचे CAP Allotment Letter
२. उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश फेरीतून प्रवेश ॲलॉट झालेला प्रवेश आवश्यक ते शुल्क भरून प्रवेश निश्चिती केंद्रावर प्रवेश निश्चित केल्याची पावती
३. प्रवेश निश्चिती केंद्रावर प्रवेश निश्चित केलयानंतर संस्थेत उपस्थित राहून विहीत मुदतीत संस्थेचे शुल्क भरल्याची पावती
४. प्रवेश घेताना सर्व मूळ कागदपत्रे संस्थेत जमा केले असल्याचा पुरावा

तसेच पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात केंद्रीभूत प्रवेश फेरीतून झालेले मात्र अपलोड करावयाचे राहिलेले प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्याची कार्यवाही संबंधित संस्थेच्या प्रतिनिधींनी विभागीय कार्यालयात उपस्थित राहून करणे आवश्यक आहे. संस्थेकडून अपलोड करावयाची राहिलेल्या उमेदवारांची माहिती खालील विवरणपत्रात नमूद करण्यात यावी :

List of UG/PG CAP alloted candidate but not confirmed or reported by Institute.

Institute Code and Name of Institute

| Sr.No. | Course | Name of Candidate | Application ID | Alloted Choice Code in CAP | CAP Round no. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Signature
Principal of the Institute

Signature
Joint Director,Regional Office.

वरील विवरणपत्रातील माहिती विभागीय कार्यालयानी संकलित करुन दि. २६.१०.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत desk2a@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठवावी आणि तदनंतर प्रत्यक्ष प्रत संचालनालयास सादर करावी.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा.आयुक्त,प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीस्तव सादर

पृष्ठांकन क्र.-विकाअ/शिक्षण/२०१७/ 2433
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 24 OCT 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था अमरावती विभाग अमरावती , यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.